Reg. No. NP CITY/236/2018-20.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक २] गुरुवार ते बुधवार, जानेवारी २२-२८, २०२६/माघ २-८, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ११.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४.

### संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

### आदेश

क्रमांक-डि.टी.पी.-वि.यो. कळमेश्वर-कलम ५०(२)-३१२५-आदेश-टिपीव्ही-२-७७७४.—

ज्याअर्थी, कळमेश्वर - ब्राह्मणी या 'क' वर्ग नगर परिषदेची दुसरी सुधारित व वाढीव हद्दीची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असे केलेला आहे) चे कलम ३१ (१) अन्वये संचालनालयाचे अधिसूचना क्रमांक टिपीव्ही-२-४२८७, दिनांक २१ जुलै, १९९२ अन्वये मंजूर झाली असून, (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिसूचना' असे केलेला आहे), ती दिनांक ०१ ऑक्टोबर, १९९२ रोजी अंमलात आलेली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त मंजूर विकास योजना " असे केलेला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये, मौ. कळमेश्वर, ता. कळमेश्वर, जि. नागपूर येथील स. क्र. ८३० (क्षेत्र ०.४६ हे.) या जमिनीपैकी, (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त जमीन " असे केलेला आहे), उक्त मंजूर विकास योजनेच्या अहवालानुसार सुमारे ३०५० चौ.मी. क्षेत्र, आरक्षण क्रमांक ५० " Extension to Police Station ", या करिता आरक्षित असून, (यापुढे " उक्त आरक्षण " असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाच्या भूसंपादन व विकासाकरिता समुचित प्राधिकरण 'पोलिस विभाग आहे (यापुढे " उक्त समुचित प्राधिकरण " असे संबोधिले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील जागेची त्यांचे विभागास आवश्यकता नसल्याचे, उक्त समुचित प्राधिकरणाच्या वतीने पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांचे, मुख्याधिकारी, नगर परिषद कळमेश्वर-ब्राम्हणी यांना पत्र क्र. नाजीग्रा - डी-३-पोस्टे. कळमेश्वर-विकास योजना-९०२३–२०२४ नागपूर, दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ अन्वये मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमेश्वर-ब्राम्हणी. जिल्हा नागपूर यांना कळविले आहे व त्यानुषंगाने नियोजन प्राधिकरणाने पत्र क्र. ०३३११/२५, दिनांक २० मार्च, २०२५ अन्वये शासनास, विहित मार्गाने उक्त आरक्षणाखालील क्षेत्र वगळणेबाबत अहवाल सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमेश्वर-ब्राम्हणी यांनी दिनांक २० मार्च, २०२५ रोजीचे पत्राद्वारे उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम ५० चे तरतूदीन्वये वगळण्यास नगर परिषदेची काहीही हरकत नसल्याबाबतचा अहवाल सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा यांना सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. ११०५, दिनांक ०९ एप्रिल, २०२५ अन्वये उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलग- ५० चे तरतुदीन्वये वगळण्यास हरकत नसल्याबाबत अहवाल सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग यांना सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग यांनी त्यांचे पत्र क्र. ९२८. दिनांक २३ जून, २०२५ अन्वये उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम ५० चे तरतूदीन्वये वगळण्यास हरकत नसल्याबाबत अहवाल संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील जागेची त्यांचे विभागास आवश्यकता नसल्याचे, उक्त समुचित प्राधिकरणाच्या वतीने पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांनी पत्र. ७४७२/२०२५, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२५ अन्वये संचालनालयास कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक टिपीएस- १८१३-३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये सर्व नगर परिषदा / नगर पंचायती आणि जिल्हा परिषद नियोजन प्राधिकरण असलेल्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाच्या कलम ५० (२) चे तरतूदी अंतर्गत आरक्षण वगळण्याबाबत मंजूरी देण्याचे अधिकार उक्त अधिनियमाचे कलम १५१ चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रत्यायोजित केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन, तसेच, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर उक्त जमीन ज्या कारणासाठी आरक्षित केली आहे, त्या कारणासाठी उक्त समुचित प्राधिकरणास आवश्यकता नसल्याची खात्री पटल्यावरुन, उक्त जमीन उक्त आरक्षणामधून उक्त अधिनियमाचे कलम ५० (२) चे तरतूदीन्वये वगळणेचा प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक असल्याचे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, यांनी त्यांचेकडील पत्र २८९८, दिनांक ०३ नाव्हेंबर, २०२५ अन्वये शासनाच्या दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निदेशानुसार उक्त जमिनीचे जमीन मालक यांनी (यापुढे " उक्त जमीन मालक " असे संबोधिले आहे) वार्षिक दर तक्त्यानुसार येणाऱ्या जमीन मूल्याच्या ५% दराने येणाऱ्या अधिमूल्य रक्कमेपैकी ५०% शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रु. ४,५३,१००/- शासकीय कोषागारात दिनांक २९ ऑक्टोंबर, २०२५ रोजी आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रु. ४,५३,१००/- कळमेश्वर- ब्राम्हणी, कळमेश्वर यांचेकडे दिनांक ३० ऑक्टोंबर २०२५ रोजी जमा केली असल्याचे संचालनालयास कळविले आहे ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ५० (२) चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशाद्वारे उक्त जमिनीपुरते उक्त आरक्षण उक्त मंजूर विकास योजनेच्या भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे वगळण्यास मंजूरी देत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत ;

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे ;

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगर परिषद, गाव, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून वगळलेले अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | (चौ.मी.) |
| १. | नगर परिषद-कळमेश्वर ब्राम्हणी, मौ. कळमेश्वर, ता. कळमेश्वर, जि. नागपूर | आरक्षण क्रमांक ५० " Extension to Police Station " (आरक्षणाचे एकूण क्षेत्र - ३८०० चौ.मी.) | सर्व्हे क्रमांक ८३० (एकूण क्षेत्र ४६०० चौ.मी.) | ३०५० |

**टीपः-** १. उक्त मंजूर विकास योजनेनुसार उक्त जमिनीतुन प्रस्तावित १८ मी. रुंद रस्त्याच्या रुंदीकरण कायम राहील.

२. उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर व मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

३. उक्त आरक्षणातून वगळलेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणाया उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, नगर परिषद, कळमेश्वर ब्राम्हणी, जिल्हा नागपूर यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

४. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**जितेंद्र ल. भोपळे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक २४ डिसेंबर, २०२५.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P.-D.P.-Kalmeshwar-Site No.50-Sec 50(2)-3125-Order-TPV-2-7774–

Whereas, the Second Revised and Additional Area Development Plan of 'C' Class Municipal Council Kalmeshwar- Brahmani has been partly sanctioned under the provisions of section 31*(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") by the Directorate of Town Planning *vide* Notification No. TPV-2/4287, dated 21$^{nd}$ July, 1992 (hereinafter referred to as "the said Notification") and come into force with effect from 01$^{st}$ October, 1992 (hereinafter referred to as "the said sanctioned Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Development Plan, the land bearing S. No. 830 (Area: 0.46 ha) of Mouja Kalmeshwar (hereinafter referred to as "the said Land" is reserved for "Extension of Police Station" as Site No.50 (hereinafter referred to as "the said Reservation") and "Police Department is the Appropriate Authority for acquisition and development of the said Reservation (hereinafter referred to as "the said Appropriate Authority") ;

And whereas, the Superintendent of Police, Nagpur District (Rural), Nagpur on behalf of the said Competent Authority has inforned Chief Officer, Municipal Council, Kalmeshwar-Brahmani, Mouja- Kalmeshwar. Taluka- Nagpur *vide* letter No. 9023/ 2024, dated 23rd September, 2024 and so accordingly, Planning Authority, Municipal Council, Kalmeshwar-Brahmani has informed along with its report for the said deletion, in accordance with the prescribed procedure, Government of Maharashtra *vide* letter No.03311/25, dated 20th March, 2025, that the said Land under the said Reservation is not necessary for Police Department ;

And whereas, to the effect that, regarding deletion of the entire area under the said Land from the said Reservation, as notified by the Competent Authority to the Planning authority; Chief Officer, Municipal Council, Kalmeshwar-Brahmani, Mouja- Kalmeshwar, Taluka- Nagpur *vide* letter No. 03311/25, dated 20th March, 2025 has submitted the said deletion report, in accordance with the prescribed procedure, to the Government for further necessary action ;

And whereas, the Chief Officer, Kalmeshwar-Brahmani, Mouja- Kalmeshwar, *vide* its letter No.03311/25, dated 20th March, 2025 has submitted a report to the Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur that, Municipal Council has no objection for the deletion of the said Reservation on the said Land under the provisions of section 50 of the said Act:

And whereas, the Assistant Director of Town Planning, Nagpur Branch. Nagpur has submitted a report *vide* its letter No.1105, dated 09th April, 2025 to the Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur stating it's no objection to delete the said Reservation on the said Land;

And whereas, the Joint Director of Town Planning. Nagpur Division. Nagpur has submitted a report vide its letter No.928, date: 23rd June, 2025 to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune stating it's no objection to delete the said Reservation on the said Land;

And whereas, the Superintendent of Police, Nagpur District (Rural), Nagpur, on behalf of the said Appropriate Authority, has informed the Directorate of Town Planning vide letter No.7472/2025. dated 03rd Septmber, 2025, that the said Land under the said Reservation is not necessary for their department;

And whereas, as per the provisions of section 151 of the said Act, the Government in Urban Development Department vide Government Resolution No.TPS-1813/3211/CR-508/UD- 13, dated 01st December, 2016 has delegated the powers exercisable by it under the provisions of section 50(2) of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans under taken by Zilha Parishad as a Planning Authority;

And whereas, to the effect that, in accordance with the above Government Resolution. regarding deletion of the entire area under the said Land from the said Reservation, as notified by the Appropriate Authority to Planning authority and after making necessary enquiry, it is satisfied that, the said Reservation on the said Land is no longer required to the said Appropriate Authority and the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, the proposal of the deletion of the said Reservation on the said Land under the provisions of section 50(2) of the said Act should be sanctioned ;

And whereas, Assistant Director, Town Planning, Nagpur Branch *vide* its letter No.2898, dated 03rd November, 2025 has communicated to the Directorate that, as per the Government directives dated 20th April, 2016, out of the premium amount calculated at the rate of 5% of the land value as per the land rates in Annual Statement of Rates (ASR), 50% premium amount of Rs.4,53,100/- payable to the Government through Government treasury on 29th October, 2025 and the remaining 50% premium amount of Rs.4,53,100/- payable to the Planning Authority with the account of Chief Officer, Municipal Council, Kalmeshwar-Brahmani dated 30th October, 2025.

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby sanctions the part deletion of the said Reservation in respect of the said Land under the provisions of section 50(2) of the said Act as shown in the Part Plan of the said Sanctioned Development Plan & for that purpose amends the said Notification of the said sanctioned Development Plan, as specified in the Schedule herein below: -

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added: –

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council, Village, Taluka and District | Reservation in the said Sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report | Description of the said Lands | Approximate Area Deleted form the said land under said Reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| | | | | (sq. mt.) |
| 1 | Municipal Council, Kalmeshwar Brahmani, Mouja- Kalmeshwar, Taluka- Nagpur, District- Nagpur. | Site No. 50, "Extension to Police Station" (Total area of Reservation- 3800 sq.m.) | S. No. 830 (Area: 0.46 ha) | Arca 3050 sq.m. |

*Note:-* 1. The said Land, in the said sanctioned Development Plan, affected by proposed road widening of 18m. wide road, shall stand retained.

2. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

3. A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which is deleted from the said Reservation, is available in the office of the Chief Officer. Municipal Council, Kalmeshwar-Brahmani, Tal. and Dist. Nagpur during office hours on all working days for inspection to public up to One month.

4. This Order shall also be published on the Directorate's official website. *www.dtp. maharashtra.gov.in.*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 24th December, 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.